**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८**

**ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३**

**कार्यपत्रिका क्र. ७**

**सभावृत्तांत**

दिनांक :- ६/०७/२०२१ वेळ :- सकाळी ११.३० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा मंगळवार दिनांक ६/०७/२०२१ रोजी सकाळी ११.३० वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा.सुरेश शिवाजी भोईर - अध्यक्ष
२. मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ
३. मा.प्रज्ञा महेश खानोलकर
४. मा. संगिता राजेंद्र भोंडवे
५. मा.नामदेव जनार्दन ढाके
६. मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई
७. मा.अश्विनी गजानन चिंचवडे - पाटील
८. मा.राजेंद्र तानाजी गावडे
९. मा.निता विलास पाडाळे
१०. मा.बिभीषण बाबु चौधरी
११. मा.विठ्ठल बबन भोईर

याशिवाय क्षेत्रीय अधिकारी श्रीमती सोनम देशमुख, श्री.प्रशांत पाटील – कार्यकारी अभियंता,(स्थापत्य), श्री.नितीन देशमुख – कार्यकारी अभियंता, (विद्युत), श्री.चंद्रशेखर धानोरकर – उपअभियंता (स्थापत्य), श्री.भाऊसाहेब साबळे - उपअभियंता (पाणीपुरवठा), श्री.इंगळे आर एम – उपअभियंता (स्थापत्य), श्री.जावरानी एम टी – उपअभियंता(पाणीपुरवठा), श्री.राजेंद्र जावळे – उप अभियंता (जलनि:सारण), श्री.अकबर शेख- उपअभियंता(विद्युत), श्री.उमेश मोने – कनिष्ठ अभियंता,श्री.मोमीन ए ए – कनिष्ठ अभियंता(स्थापत्य उद्यान), , श्री.कुंडलिक दरवडे – सहा.आरोग्याधिकारी, श्री.पारोल के.बी- मुख्य आरोग्य निरीक्षक इत्यादी उपस्थित होते

----------

**मा. सभापती**– सर्व सन्मा सदस्य व अधिकारी/कर्मचारी यांचे स्वागत करुन सभेस सुरुवात करणेत येत आहे.

दिनांक २/०३/२०२१ रोजीचा (कार्यपत्रिका क्र.६) सभावृत्तांत कायम करणेत आला.

ठराव क्र. २० विषय क्र. १
दि. १२ /०२/२०२१
सुचक : मा.राजेंद्र गावडे अनुमोदक: मा.अश्विनी चिंचवडे
संदर्भ :- मा.राजेंद्र गावडे यांचे दिनांक १२/०३/२०२१ चे पत्र

मा.राजेंद्र गावडे यांचे दिनांक १२/०३/२०२१ चे पत्रानुसार प्रभाग क्र.१८ मधील स.नं.२८८ व २८९ यांसी सि.स.नं.१५९८,१५९९,१६०० हा ६ मी.नॉन डी पी रस्ता आहे. सदर ठिकाणी नागरी वस्ती असुन लोक सदर रस्त्याचा वापर करीत आहेत, तरी सदर रस्ता २०५ अन्वये घोषीत करणेस मान्यता देणेत येत आहे.

**सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.**

---------

ठराव क्र. विषय क्र. २
दि. १२ /०२/२०२१
सुचक : मा.करुणा चिंचवडे
संदर्भ :- १)मा.करूणा चिंचवडे यांचे दिनांक २९/०६/२०२१ चे पत्र

२) मा.करुणा चिंचवडे यांचे दिनांक ३/०२/२०२१ चे पत्र

मा.करूणा चिंचवडे यांचे दिनांक २९/०६/२०२१ चे पत्रानुसार प्रभाग क्र.१७ मधील चिंचवड ते रावेत या मार्गावर ३४.५० मीटर या रस्त्याचे काम सध्या पुर्णत्वाकडे असुन वाल्हेकरवाडी आणि रावेतला जोडणारा वाल्हेकरवाडी सीमेवरील पुलास राजमाता जिजाऊ ब्रिज व वाल्हेकरवाडी व रावेत चौक यांना जोडणा-या रस्त्याला राजमाता जिजाऊ मार्ग असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे

सदर ठराव तहकुब करणेत येत आहे.

---------

## सभा कामकाजात ऐनवेळी दाखल केलेले विषय घेणेत आले ते खालीलप्रमाणे

१) मा.नामदेव ढाके यांचे दिनांक ०६/०७/२०२१ चे पत्रानुसार प्र.क्र.१६ येथील रस्ता
२) मा.सचिन चिंचवडे यांचे मार्च २०२१ चे पत्र

३) मा.प्रज्ञा खानोलकर यांचे दिनांक ०६/०७/२०२१ चे पत्र
४) मा.मोरेश्वर भोंडवे यांचे दिनांक २३/०३/२०२१ चे पत्र
५) मा.मोरेश्वर भोंडवे यांचे दिनांक ०६/०७/२०२१ चे पत्र
६) मा.मोरेश्वर भोंडवे यांचे दिनांक ०६/०७/२०२१ चे पत्र

ठराव क्र. २१ विषय क्र. ३
दि. १२ /०२/२०२१
सुचक : मा.नामदेव ढाके अनुमोदक – मा.सुरेश भोईर
संदर्भ :- मा.नामदेव ढाके यांचे दिनांक ०६/०७/२०२१ चे पत्र

मा.नामदेव ढाके यांचे दिनांक ०६/०७/२०२१ चे पत्रानुसार रावेत मधील सर्व्हे नं.१३० व १२० च्या पुर्वेला नाल्याच्या बाजुला अस्तित्वात असणारा वहिवाटीचा रस्ता नागरीकांना येण्याजाण्यासाठी अपुरा पडत असल्याने तो रस्ता २०५ अंतर्गत १८ मी.चा करणेस करणेस मान्यता देणेत येत आहे.

**सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.**

---------

ठराव क्र. २२ विषय क्र. ३
दि. ६ /०७/२०२१
सुचक : मा.सचिन चिंचवडे अनुमोदक: मा.माधुरी कुलकर्णी
संदर्भ :- मा. सचिन चिंचवडे यांचे मार्च २०२१ चे पत्र

मा.सचिन चिंचवडे यांचे मार्च २०२१ चे पत्रानुसार रावेत सी डी वर्क पासुन ते वाल्हेकरवाडी ३४.५ मीटर रोडला जोडणा-या पुलाला श्री छत्रपती शिवाजी महाराज असे नाव देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

( मा.अतिरिक्त आयुक्त (२) यांचे पत्र क्र.भुजि/९/कावि/२२३/२०२० दिनांक २३/०९/२०२० अन्वये प्रभाग कार्यालयांतर्गत असलेल्या रस्त्यांना व सार्वजनिक जागांना नावे देण्याबाबत स्वतंत्र धोरण निश्चीत करण्यात येणार आहे, तरी धोरण निश्चीत झाल्यानंतर सदर विषयाबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्र. २३ विषय क्र. ७

दि. ६ /०७/२०२१

सुचक : मा.प्रज्ञा खानोलकर अनुमोदक: मा.संगिता भोंडवे

संदर्भ :- मा. प्रज्ञा खानोलकर यांचे दिनांक ०५/०७/२०२१ चे पत्र

मा.प्रज्ञा खानोलकर यांचे दिनांक ०५/०७/२०२१ चे पत्रानुसार प्रभाग क्र.१६ किवळे रावेत मधील किवळे येथील साई बाबा चौक ते चंद्रकांत राऊत या रस्त्याला श्री.नारायण गुरु मंदिर रस्ता तसेच साई बाबा चौक ते वीर बाबा चौकादरम्यानच्या लोकवस्तीस श्री.नारायण नगर (एस.एन.नगर) असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

( मा.अतिरिक्त आयुक्त (२) यांचे पत्र क्र.भुजि/९/कावि/२२३/२०२० दिनांक २३/०९/२०२० अन्वये प्रभाग कार्यालयांतर्गत असलेल्या रस्त्यांना व सार्वजनिक जागांना नावे देण्याबाबत स्वतंत्र धोरण निश्चीत करण्यात येणार आहे, तरी धोरण निश्चीत झाल्यानंतर सदर विषयाबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्र. २४ विषय क्र. ४

दि. ६ /०७/२०२१

सुचक : मा.मोरेश्वर भोंडवे अनुमोदक: मा.सुरेश भोईर

संदर्भ :- मा. मोरेश्वर भोंडवे यांचे दिनांक २३/०३/२०२१ चे पत्र

मा.मोरेश्वर भोंडवे यांचे दिनांक २३/०३/२०२१ चे पत्रानुसार रावेत प्र.क्र.१६ चा दिवसेंदिवस विस्तार आणि विकास होत आहे. रावेत येथील सर्वे नं.७७ मध्ये अनेक नवीन गृह निर्माण संकुल उभे राहिले आहेत. काही नवीन गृह संकुलनाची निर्मीती प्रगती पथावर आहे. रावेत मधील नव्याने विकसीत होत असलेल्या या भागाला विशिष्ट असे नाव नसल्याने या परिसराची ओळख तात्काळ लक्षात येत नाही. त्यामुळे रावेत येथील सर्व्हे नं.७७ ला छत्रपती संभाजी महाराज नगर असे नामकरण केल्यास या भागाची रावेत परिसरात वेगळी ओळख निर्माण होईल. तरी रावेत येथील सर्वे नं.७७ ला संभाजी नगर असे नाव देण्यास मान्यता देणेत येत आहे.

( मा.अतिरिक्त आयुक्त (२) यांचे पत्र क्र.भुजि/९/कावि/२२३/२०२० दिनांक २३/०९/२०२० अन्वये प्रभाग कार्यालयांतर्गत असलेल्या रस्त्यांना व सार्वजनिक जागांना नावे देण्याबाबत स्वतंत्र धोरण निश्चीत करण्यात येणार आहे, तरी धोरण निश्चीत झाल्यानंतर सदर विषयाबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्र. २५ विषय क्र. ५

दि. ६ /०७/२०२१

सुचक : मा.मोरेश्वर भोंडवे अनुमोदक: मा.सुरेश भोईर

संदर्भ :- मा. मोरेश्वर भोंडवे यांचे दिनांक ०६/०७/२०२१ चे पत्र

मा.मोरेश्वर भोंडवे यांचे दिनांक ०६/०७/२०२१ चे पत्रानुसार रावेत प्र.क्र.१६ येथे लोकवस्ती झपाटयाने वाढत आहे. सदरचा परिसर अद्याप विकसित झालेला नाही. रावेत भागातील से.क्र.७४ मध्ये १२ मी. डी पी लगत/जी.के असोसिएट्स सोसायटी समोरील I to R अंतर्गत २ गुंठे जागा महानगरपालिकेचे ताब्यात आलेली आहे. सदर जागेवर तात्पुरत्या स्वरुपात विरंगुळा केंद्र/वाचनालयाचे शेड टाकुन मिळावे, जेणेकरुन येथील स्थानिक जेष्ठ नागरिकांना तेथे बसण्यासाठी/ वाचनासाठी मदत होईल व महानगरपालिकेचा वापर चालु झाल्याने सदर जागेवर अतिक्रमण होणार नाही. सदर विषयास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्र. २६ विषय क्र. ६

दि. ६ /०७/२०२१

सुचक : मा.मोरेश्वर भोंडवे अनुमोदक: मा.सुरेश भोईर

संदर्भ :- मा. मोरेश्वर भोंडवे यांचे दिनांक ०६/०७/२०२१ चे पत्र

मा.मोरेश्वर भोंडवे यांचे दिनांक ०६/०७/२०२१ चे पत्रानुसार रावेत प्र.क्र.१६ येथे रावेत भागातील पेठ क्र.२९ येथे आठवडे बाजार आहे. तसेच सदर भागात डी मार्ट असल्याने या भागात नागरिकांची मोठया प्रमाणात वर्दळ असते. सदर भागात आठवडे बाजार शेजारी FRP जुनी संडास मुतारी आहे. सदरची संडास मुतारी काढुन त्याच ठिकाणी पक्क्या स्वरुपाची बांधणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

वरील प्रमाणे सभेचे कामकाज झाले मा. सभापती यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

[सुरेश शिवाजी भोईर]
सभापती
ब प्रभाग समिती, चिंचवड

पिंपरी चिंचव महानगरपालिका,
ब प्रभाग कार्यालय, चिंचवड ३३
जा. क्र. बक्षे/सभाशाखा/२/कावि/     /२०२१.
दिनांक : १६/०७/२०२१

प्रशासन अधिकारी
तथा
सचिव( सभाशाखा )
ब प्रभाग समिती

प्रत -सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

ब क्षेत्रिय कार्यालय ,चिंचवड

क्र.बक्षेका/ २ /   /२०२१

दिनांक - १६/०७/२०२१

प्रति,

सर्व विभागप्रमुख,
ब क्षेत्रिय कार्यालय,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**विषय - मा.ब प्रभाग मासिक सभेमध्ये झालेल्या विषयांवर योग्य ती कार्यवाही करणेबाबत..**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २९ अ नुसार प्रभाग समितीची स्थापना करण्यात आली असुन सदरच्या समिती या कायद्याने गठीत केलेल्या आहेत. प्रभाग समितीत होणा-या कामकाजाबाबत कार्यवाही करणे हे संबंधित क्षेत्रिय कार्यालयाची जबाबदारी आहे.

ब क्षेत्रिय कार्यालय प्रभाग समिती मासिक सभा प्रत्येक महिन्याच्या पहिल्या मंगळवारी सकाळी ११.३० वाजता घेण्यात येते, या सभेत सर्व संबंधित शाखाप्रमुख यांनी उपस्थित राहणे बंधनकारक आहे.

माननीय सदस्य यांनी आपले विभागाशी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर अभ्यासपुर्वक माहिती समिती सभेत देणेत यावी तसेच प्रभाग समितीत झालेल्या सभावृत्तांतातील ठरावांवर नियमाधीन कार्यवाही करणेत यावी. याबाबत क्षेत्रिय कार्यालयाकडुन कोणताही वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही. याची स्पष्ट नोंद घ्यावी. दिनांक ६/०७/२०२१ रोजी झालेल्या मासिक सभेमध्ये नगरसदस्यांनी खालीलप्रमाणे आपल्या समस्या मांडल्या, त्यावर लवकरात लवकर योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा उचित अहवाल उलट टपाली प्रशासन विभाग, ब क्षेत्रिय कार्यालय येथे पाठविणेत यावा.

| अ.क्र. | मा.नगरसदस्य | उपस्थितीत केलेले प्रश्न | संबंधित विभाग |
|---|---|---|---|
| १ | मा.नामदेव ढाके | १) रावेत मधील सर्व्हे क्र.१३० व १२० च्या पुर्वेला नाल्याच्या बाजुला असणारा वहिवाटीचा रस्ता नागरीकांना येण्या जाण्यासाठी अपुरा पडत असल्याने तो रस्ता २०५ अंतर्गत १८ एम चा करणे.<br>२) काळेवाडी नदीशेजारी राडारोडा टाकणेत येत आहे याबाबत पर्यावरण विभागाने कार्यवाही करावी.<br>३) ब प्रभाग कार्यक्षेत्रातील भोंडवे कॉर्नर, गुरुव्दारा चौक ते आकुर्डी रेल्वे स्टेशन रोड, केशवनगर बस स्टॉप जवळ तसेच मोरया गोसावी स्टेडीयम परिसर, केशवनगर येथील अनधिकृत पत्राशेड/बांधकाम हटविणे | स्थापत्य<br>पर्यावरण |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | मा.राजेंद्र गावडे | १) ओपन प्लॉट असलेल्या जागी अनेक प्रकारे अतिक्रमण केले जाते, याबाबत पर्यावरण विभागाने योग्य ती कार्यवाही करावी.<br>२) ब प्रभाग कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र.१८ मधील चिंचवड गाव व काळेवाडी येथील पवना नदीच्या काठाजवळ काही नागरीक / ठेकेदार राडारोडा आणुन टाकत असल्याने नदीच्या पात्रात अडथळा निर्माण होत असुन संबंधित बाब ही मा.एनजीटी यांचे आदेशाचे उल्लंघन करणारी आहे, तरी अशा प्रकारे राडारोडा आणुन टाकणा-या नागरीकांवर /ठेकेदारांवर आपल्यामार्फत लवकरात लवकर कारवाई करणे | पर्यावरण अतिक्रमण |
| ३ | मा.मोनाताई कुलकर्णी | १) इंदिरानगरच्या पुढील चौकात विरंगुळा केंद्र करण्यात यावे. | स्थापत्य |

क्षेत्रिय अधिकारी तथा सहा. आयुक्त

ब क्षेत्रिय कार्यालय पिं.चि.मनपा

चिंचवड पुणे ३३